संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# निवडणूक प्रक्रियेविरोधात याचिकांचा उच्चांक

**नुकत्याच** संपलेल्या महापालिका निवडणुकीच्या यश-अपयशाचे कवित्व अजूनही चालू आहे. २२७ नगरसेवक असलेल्या या महापालिकेसाठी काही हजार उमेदवारांनी अर्ज भरले होते. आता निकालानंतर निवडणुकीतील वेगवेगळ्या मुद्यांवरून थोडेथोडके नव्हे तर तब्बल १२५ जणांनी याचिका दाखल केलेल्या आहेत. त्यात इव्हीएम मशीनमधील गोंधळापासून ते विजयी उमेदवाराचा अर्ज अयोग्य असण्यापर्यंत वेगवेगळ्या आरोपांचा समावेश आहे. एका वॉर्डात भाजपा आणि सेना या दोघाही उमेदवारांना समान मते पडली आहेत. त्यानंतर चिठ्ठ्या टाकून निकाल घोषित केला गेला. त्यामध्ये भाजपा उमेदवाराला विजयी ठरवले गेले. या प्रकारालाही हरकत घेऊन न्यायालयात याचिका दाखल झाली आहे. तर अन्य एका पराभूत भाजपा उमेदवाराने प्रतिस्पर्ध्याचा उमेदवारी अर्ज योग्य रितीने भरला नसल्याची हरकत घेतली आहे. काही जणांनी अर्ज भरताना चुकीची माहिती दिल्याचा तसेच जातीचे अयोग्य प्रमाणपत्र जोडल्याचेही म्हटले आहे. परंतु, २२७ नगरसेवकांच्या निवडणुकीला १२५ लोकांनी थेट न्यायालयात जाऊन हरकत घ्यावी, हादेखील आतापर्यंतचा एक उच्चांक ठरतो. आतापर्यंत कधीही इतक्या मोठ्या प्रमाणावर न्यायालयात याचिका दाखल झालेल्या नाहीत किंवा विजयी उमेदवाराबद्दल पराभूत उमेदवाराने इतक्या मोठ्या संख्येने आक्षेप घेतलेलेही आढळून येत नाही. मग याच वेळेला आक्षेप घेणाऱ्यांची संख्या का वाढली, हा महत्त्वाचा मुद्दा ठरतो. याची साधारणपणे तीन कारणे समोर येतात. एक म्हणजे पंचवीस वर्षांनंतर प्रथमच सेना भाजपाने स्वतंत्रपणे निवडणुका लढवल्या. त्यामुळे उमेदवारांची संख्या वाढली. शिवाय या दोघांमधली लढत कधी नव्हे ती इतकी चुरशीची झाली, त्यामुळेसुध्दा आपल्या अपयशाची खंत अनेक उमेदवारांना लागली असावी आणि दुसरे महत्त्वाचे कारण म्हणजे इव्हीएम मशीनबद्दल अजूनही लोकांच्या मनामध्ये संभ्रमाचे वातावरण आहे. त्या विरोधातही यावेळी प्रथमच सर्वाधिक आक्षेप घेतले गेले आहेत. लोकशाहीत निवडणूक प्रक्रिया ही निष्पक्ष किंवा पारदर्शक असावी, असे मानले जाते. मतदानातून व्यक्त होणारा कौल हा संबंधित राजकीय पक्षांनी किंवा त्यांच्या उमेदवारांनी तितक्याच दिलदारपणे स्वीकारला पाहिजे, अशीदेखील एक अपेक्षा ठेवली जाते. किंबहुना निवडून येण्याची किंवा निवडून देण्याची प्रक्रीया मतदानातूनच प्रभावीपणे राबवता येऊ शकते. यासाठी अन्य कुठलेही माध्यम तितकेसे उपयुक्त किंवा प्रभावी मानले जात नाही. मतदानातून व्यक्त झालेला जनमताचा कौल एकीकडे स्वीकारीत असताना मतदान प्रक्रियेतल्या तुटी किंवा उणिवांविरुध्द इतक्या मोठ्याप्रमाणात जर आक्षेप नोंदवले जात असतील, तर मात्र त्याचा गंभीरपणे विचार झाला पाहिजे.

### पालिकेच्या इतिहासात प्रथमच

तसे पाहिले तर ही महापालिकेची निवडणूक होती. एका महानगरापुरत्या मर्यादित असलेल्या एका स्वायत्त संस्थेत प्रतिनिधी निवडून पाठवण्यापुरतीच त्याची कार्यकक्षा असते. ती काही लोकसभा, विधानसभा, यासारख्या मोठ्या संस्थांवरील प्रतिनिधीच्या निवडीसाठी नव्हती. तरीदेखील जर जवळपास १२५ याचिका न्यायालयात दाखल झाल्या असतील तर तोदेखील एक अभ्यासाचा विषय ठरतो. प्रामुख्याने निवडणूक प्रक्रिया हा जर या सगळ्या याचिकांचा एकत्रित आक्षेप असेल तर न्यायालयानेच पुढाकार घेऊन या याचिकांची एकत्रितपणे सुनावणी करायलाही हरकत नाही. अगदी उमेदवारी अर्ज दाखल करताना न पाळले गेलेले नियम प्रत्यक्ष निवडणुकीत झालेला विविध नियमांचा भंग किंवा मतदान सुरू असताना मतदान यंत्रातील गोंधळाविषयीचे आक्षेप या सगळ्या गोष्टी निवडणूक प्रक्रियेशी जोडल्या जातात. प्रत्यक्ष निवडणुकीच्या मैदानात उतरल्यानंतर त्यातल्या अंतर्गत गोष्टी लक्षात येत नाहीत. यातल्या १२५ याचिकाकर्त्यांनी प्रत्यक्ष निवडणूक प्रक्रियेत भाग घेतलेला आहे. त्यातून त्यांना निश्चितच काही अनुभव आले असण्याची शक्यता आहे. जी निवडणूक प्रक्रिया सर्वाधिक पारदर्शक असणे अपेक्षित मानले जाते त्याबद्दलच हरकत घेतली गेलेली दिसते. मुंबई महापालिका निवडणुकीच्या इतिहासातील निश्चितच हा पहिला प्रकार ठरतो. विक्रमी हरकती घेतल्या गेल्यामुळे त्याचा निपटारादेखील तितक्याच वेगाने होण्याची गरज आहे. बऱ्याच वेळेला पाच वर्षांची मुदत संपेपर्यंत या प्रक्रियेशी संबंधित खटल्यांचा किंवा आक्षेपांचा निकाल लागत नाही. तसे न होता यावेळची सर्वाधिक याचिकांची संख्या लक्षात घेऊन संबंधित लोकांचे शंका निरसन झाले पाहिजे. किंबहुना त्यांना अपेक्षित असलेला न्याय न्यायालयाकडून मिळाला पाहिजे. यामध्ये अतिशय किरकोळ किंवा छोट्याशा तक्रारींचा समावेश असू शकतो. इतक्या लहानसहान गोष्टींसाठी न्यायालयात याचिका दाखल करण्याचीसुध्दा गरज नाही, असादेखील युक्तीवाद होऊ शकतो.

### निवडणूक आयोगाविषयी अविश्वास

याठिकाणी आक्षेप घेण्यात आलेल्या मुद्यांचेच विशेष महत्त्व आहे. कारण या छोट्या छोट्या वाटणाऱ्या गोष्टींमध्ये निवडणूक प्रक्रियेची पारदर्शकता दडलेली आहे. या प्रक्रियेत सहभागी होणाऱ्या किंवा प्रत्यक्ष अनुभव घेणाऱ्यांना त्यात तुटी आहेत, असे वाटत असेल तर त्यांना नाइलाजाने न्यायालयात धाव घेण्याशिवाय पर्याय उरत नाही. कारण यासंदर्भातल्या शंकांचे निरसन करण्याची क्षमता निवडणूक आयोगाकडे तर नाहीच, शिवाय ज्यावेळी इतक्या मोठ्या संख्येने न्यायालयात याचिका दाखल होतात, त्यावेळी तो निवडणूक आयोगावरचा अविश्वास आहे हेही सिध्द होते. निवडून देण्यासाठी जनतेने केलेले मतदान सार्वभौम ठरते. त्याबद्दल कोणाचाही आक्षेप असण्याचे कारण नाही. परंतु मतदानाची प्रक्रिया किंवा कार्यपध्दती ही अधिक बिनचूक आणि व्यवस्थित असणे गरजेचे आहे. आता या तब्बल १२५ याचिकांचा निकाल केव्हा आणि कसा लागेल हे सांगता येत नाही. परंतु यावेळच्या मुंबई महापालिका निवडणुकीतला याचिकाकर्त्यांचा हा उच्चांक निश्चितच निवडणूक प्रक्रियेतील सुधारणांविषयी उत्सुकता जागवणारा ठरतो. म्हणूनच न्यायालयाने याचिकांची ही संख्या लक्षात घेऊन त्याचे महत्त्व ठरवले पाहिजे आणि शक्यतो एकत्रितपणे आणि अधिकाधिक लवकरात लवकर या याचिका निकाली काढल्या पाहिजेत.